RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक १४(८)] मंगळवार, जानेवारी ३१, २०२३/माघ ११, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ३२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी, २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९.**

क्रमांक न्यास्थाप-१०१९/८२३/प्र.क्र.१७३/कार्यासन-११.—महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम,१८६९ (१८६९ चा १४) याची कलमे २१, २२अ व २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून, जेथवर त्या सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील जिल्हा न्यायालयास दुय्यम असलेल्या दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयाशी संबंधित आहेत तेथवर, महाराष्ट्र शासन, याद्वारे असे निदेश देत आहे की, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२३ पासून,

(क) सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे, जिल्हा न्यायालय, बार्शी, जि. सोलापूर यास दुय्यम असलेले दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) असेल ;

(ख) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हे उक्त न्यायालयाचे पीठासन अधिकारी असतील व ते करमाळा येथे त्यांचे न्यायालय भरवतील ; आणि

(ग) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) करमाळा यांच्या सर्वसाधारण व विशेष अधिकारितेच्या स्थानिक सीमा सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या महसुली तालुक्यामधील क्षेत्रांशी समव्यापी असतील व त्यात त्यांचा समावेश असेल आणि जे काम यापूर्वी बार्शी येथील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्या सर्वसाधारण व विशेष अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट होते ते उक्त क्षेत्रातील काम, त्यातून वगळण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने,**
शासनाचे सहसचिव.



Scanned with CamScanner

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 30th January, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT, 1869.

No. Nyasthap-1019/823/C.R.173/Desk-11.— In exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act,1869 (XIV of 1869), and of all other powers enabling it in this behalf ; and in partial modification of earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the Court of Civil Judge, Senior Division, Barshi in District Solapur, sub-ordinate to the District Court, Barshi, in District Solapur, the Government of Maharashtra, hereby directs that, with effect from the 5th February, 2023,

(*a*) there shall be a Civil Court at Karmala sub-ordinate to the District Court of Barshi in Solapur District ;

(*b*) the said Court shall be presided over by the Civil Judge, Senior Division, who shall hold his Court at Karmala ; and

(*c*) the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge, Senior Division, Karmala, shall comprise the areas covered within the local limits of the revenue Taluka of Karmala in Solapur District and the work from the said area which were heretofore included within the local limits of the ordinary and special jurisdiction of the Civil Judge, Senior Division, Barshi in District Solapur shall be excluded therefrom.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. V. JIWANE,
Legai Advisor-*cum*-Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE

Scanned with CamScanner